REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# भंडारा जिल्हयातील ऐतिहासिक किल्ल्यांचा अभ्यास

डॉ. अरूण हटवार
सी.जे.पटेल कॉलेज, तिरोडा.

## प्रास्ताविकः

''विदर्भ विषयः सारस्वत जन्मभू'' अशा शब्दात विदर्भाचे वर्णन शके ९५० मध्ये होऊन गेलेल्या राजशेखर (वत्सगुल्म) याने केले आहे. विदर्भातील प्राचीन स्थळाची विभागणी पुराश्मयुगापासून करता येते. या पुराश्मयुगात वैनगंगेच्या आणि वर्धेच्या काठी मानवी वस्ती होती. मात्र पुराश्मयुगानंतर नवाश्म युगात विदर्भात मानवी वस्ती असल्याचा पुरावा सापडला नाही. त्यानंतर लघुश्मयुगीन मानवाच्या पाऊलखुणा आढळल्या आहेत. नागपूर येथील सेमिनरी हिल्सवर या काळची हत्यारे आढळली आहेत. बाणफलक, चंद्रकोरीसारखे व भौमितिक स्वरूपाची हत्यारे होत. पाषाणकाळ, इतिहासपूर्व काळ आणि इतिहास काळ हे मानवी सांस्कृतिक इतिहासाचे प्रमूख तीन कालखंड कल्पिण्यात आले आहेत. विदर्भातील अश्मयुगाशी संबंधित ऐतिहासिक काळातील स्थळे पवनारा(वर्धा जिल्हा), पवनी (भंडारा जिल्हा), मांढळ, अडम, रामटेक, आंभोरा (नागपूर जिल्हा) इत्यादी ठिकाणी आढळली आहेत. यापैकी पवनार, पवनी, मांढळ व अडम येथे नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्व विभागाने उत्खनन केलेले आहे. मानवाच्या गरजातून निर्माण झालेली प्रेरणा व कौशल्य पणास लावून त्यांनी निर्माण केलेले व शिल्लक असलेले अवशेष प्राचीन संस्कृतिची साक्ष देत डौलाने उभे आहेत.

## अभ्यासप्रदेशः

निसर्गाच्या कुशीत वसलले हा भंडारा जिल्हा विदर्भाचे एक प्रकारचे ऐतिहासिक माहेरघरच! भंडारा जिल्ह्याचा इतिहास रो हर्षक आहे. येथील पौराणिक, राष्ट्रीय, सामाजिक, शैक्षणिक व कलेलचा इतिहास वैनगंगेच्या कुशीत दडलेला आहे. वैनगंगा ही येथील सर्वात मोठी नदी. तिचा उगम मध्य प्रदेशात झाला आहे. बालाघाट, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातून वाहत जाऊन पुढे गोदावरीस मिळते. जिल्ह्याच्या पश्चिम भागातून उत्तर–दक्षिण तर पवनीपासून पश्चिम–पूर्व वाहते. पवनीच्या पुढे इटान गावाजवळ तिच्या पात्रात एक बेट आहे. वाघ, बावनथडी, चूलबंद, गाढवी ह्या तिच्या उपनद्या आहेत. तिच्या उपनद्यांनी मिळून भंडारा जिल्ह्याची जमीन सुपीक झाली आहे. भाताची सुंदर हिरवीगार व सोनेरी शेते, झुळझुळ वाहणारे स्फटिकमय पाणी, हिरव्या गर्द रानातून डोकावून पाहणारे डोंगर व टेकड्या, उंचच उंच वाढलेले विविध जातीचे वृक्ष, उच्च दर्जाचे सागवान, बांबू, लाख, डिंक, तेंदूपत्ता इत्यादी मौलिक वनसंपत्ती तसेच नवेगांवबांध, नाझिरा, वाघ, इटियाडोह ही विरंगुळ्याची निसर्गरम्य ठिकाणे, रानात पसरलेली निरवता, तांबड्या मातीच्या रस्त्यावरून चालताना लाजरे सृष्टीसौंदर्य न्याहाळणारे व समाधानाचे सुस्कारे सोडत परतणारे व स्वत:ला धन्य समजणारे पर्यटक, तलावांचे आगार, ताजी फडफडणारी मासोळी, ऐतिहासिक स्थळे, संस्कृत नाटककार भवभूति, आद्यकवी मुकुंदराज, अनेक कारखाने, येथे सापडणारे ग्रॅनाइट, मॅगनीज, क्रो इट, कायनाइट, सिलीमनाइट ही खनिजे, लोखंड, सोने, हिरवे अभ्रक, शिसे तसेच काही किरणोत्सरी खनिजेही जिल्ह्यात सापडतात. एकंदरीत नैसर्गिक संपत्तीचे वरदान भंडारा जिल्ह्याला लाभलेले आहे.



## विषयविवेचनः

देवगढावर गवळी राजे राज्य करीत असतांना भानारा (भंडारा) प्रदेश यांच्या राज्यात मोडत होता. भानारा गाव मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे गवळीराजांनी सु ारे१५ व्या शतकात भानारा किल्ला बांधला असावा.भानारा किल्ला

## भुईकोट किल्ला

१. हा किल्ला भुईकोट (जमिनीवर) असून मजबूत व लढाऊ किल्ला होता. याकिल्ल्याभोवती ६ तट (परकोट) होते. हे सर्व तट युद्धात किंवा जीर्ण होऊढासळले असावेत. आज त्यावरभानारा शहर वसलेले आहे. दुसऱ्या तटाची भिंतकिल्ल्याच्या प्रवेश द्वाराच्या पुलाजवळ पहावयास मिळते. या भिंतीची लांबी २६०फूट, उंची १६ फूट व रुंदी ३ फूट आहे. ही भिंत जमीनित दाबलेली आहे. बाकीचातट उध्वस्त झालेला आहे.

२. किल्ल्या भोवती खोल खंदक होता. हा खंदक दुसरा व तिसऱ्या तटामध्ये असावा. किल्ल्याच्या पूर्वेकडे दक्षिणेकडे व पश्चिमेकडे खंदकाचे खड्डे दिसतात.१ खंदकाच्या ठिकाणी सध्या शेती केली जाते. युद्धकाळात खंदक पाण्याने तुडूंब भरला जात होता. त्यामुळे किल्ल्यावर अचानक आक्रमण करता येत नव्हते. या खंदकात खांब तलावाचे पाणी सोडले जात असावे.

३.किल्ल्याची लांबी सुमारे ४८० फूट व रुंदी ४०० फूट आहे. त्या काळात किल्ल्याला ११ बुरुज असावेत. सध्या ५ बुरुज अस्तीत्वात आहेत. त्यापैकी ३ बुरुजांना १९९८ – १९९९ मध्ये सिमेन्टनी प्लॉस्टर केले आहे. बाकीचे बुरुज युद्धकाळात तोफेच्या माऱ्यामुळे ढासळले असावेत. बुरुजांची उंची ३५ ते ४० फूट आहे. बुरुजांचा वरचा व्यास ४५ फूट व पायथ्याचा व्यास ५० फुटापर्यंत आहे.२

४. हा किल्ला दगड व विटांनी बांधलेला आहे. किल्ल्याचा तट युद्धकाळात तोफेच्या माऱ्यामुळे विविध काळात पडला असावा. त्यामुळे पूर्वेकडील तटाचा काही भाग विविध काळात बांधलेला दिसतो. किल्ल्याचा दक्षिणेकडील तट ढासळलेला होता. म्हणून तो अलिकडेच चिऱ्यांच्या दगडाने बांधून काढलेला आहे. बुरुजावर चढण्याकरिता पूर्वी पायऱ्या होत्या. त्या काढून टाकल्या आहेत.

## किल्ल्याची वैशिष्टे

### (१) किल्ल्यातील भिंती –

किल्ल्यातील भिंती आतल्या भागाकडून एवढ्या जाड आहेत कि त्यावरू जीप गाडी धावू शकते. सैन्याच्या हालचालीकरिता अशी व्यवस्था केलेली असते.

### (२) किल्ल्याचे बुरुज –

किल्ल्याच्या नैऋत्य बुरुजावर लहान आकाराच्या कोरलेल्या मुर्ती होत्या. ह्या मूर्ती समृद्धीच्या प्रतिक समजल्या जात असल्यामुळे शेतकरी लोक हंगामाच्या वेळी मुर्तीची पूजा करीत होते. पण सध्या ह्या बुरुजाला प्लॉस्टर केल्यामुळे मुर्त्या दिसत नाही. किल्ल्याच्या उत्तरेकडील तटावर प्रदेश द्वाराजवळ दगडावर कोरलेल्या भगवान बुद्धाच्या दोन मूर्ती दिसतात.

### (३) किल्ल्याचा भूयारी मार्ग –

भंडारा येथील किल्ला (सध्याचे कारागृह) देवगढ (जि. छिंदवाडा) येथील गवळी राजांनी १५ व्या शतकात बांधला असावा.३ त्याचवेळी युद्धकाळात किल्ल्यातून बाहेर पडण्याकरिता भूयारी मार्ग (गुप्त मार्ग) काढण्यात आला. भंडारा येथे इ. स. १७३९ मध्ये झालेल्या गोंड–नागपूरकर भोसले युद्धात भंडारा किल्ल्याचा किल्लेदार हरी पाटील याच भूयारातून लाल गोट्याजवळ (या गोट्याचा तपास लागलेला नाही) बाहेर निघाला असा उल्लेख आहे. त्या काळात भंडारा येथे काळा पाषाण व लाल पाषाण प्रसिद्ध होते. त्यापैकी काळा पाषाण मन्रो (लाल बहादुर शास्त्री – शासकीय शाळा, विद्यालय) विद्यालयाजवळ व लाल पाषाण भूयाराच्या शेवटीहोता.४

## ऐतिहासिक भूयार मार्ग –

भंडारा किल्ल्याच्या पश्चिम तटात कुलूप असलेली खोली आहे. त्या खोलीत उतरण्याकरिता पायऱ्या आहेत असे म्हणतात. एकदा कारागृहातील एका कैद्याने या भूयारातून पळून जाण्याचा प्रयत्न केला होता. पण उग्रवास, कोंदट हवा व अंधकार यामुळे तो परत आला. तेव्हापासून ह्या खोलीत कायमचे कुलूप असते. भूयाराचा मार्ग या खोलीतून दक्षिणेकडे अर्धा कि.मी.

अंतरावरील डी.एस.पी. बंगल्यातील तळघरापर्यंत गेला असावा असे म्हणतात.डी. एस. पी. बंगल्यातील तळघर – डी. एस. पी. (जिल्हा कार्यालयाच्या जवळ) यांच्या बंगल्यात तळघर आहे. भूयारातून प्रथम तळघरात येतात व तळघरातून बाहेर निघत असावे. हे तळघर लालगोट्याजवळ होते. पण इंग्रजांनी इ. स. १८२२ मध्ये जेव्हा डी.एस.पी. (पूर्वीचेकप्तान) यांच्याकरिता तळघरावर बंगला बांधला त्यावेळी लालगोटा फोडून नष्ट केला असावा. या तळघरावर बंगला बांधताना सुरक्षिततेच्या दृष्टीने तळघर व भूयाराचा रस्ता माती गोट्याने बुजविला असावा. या तळघराची पूर्व पश्चिम लांबी २८ फूट व उत्तर दक्षिण रुंदी १८ फूट आहे. तळघराची भींत चूना विटांची असून किल्ल्याच्या भिंती सारखी १५ फूट जाड आहे. या जाड भिंतीत हवा खेळण्याकरिता चौकोणी झरोखा आहे. त्याची लांबी १५ फूट आहे. ही जाड भिंत जमीनीपासून ३ फूट उंच आहे. म्हणून या तळघरात इंग्रजांच्या काळात ३ फूट उंचीचे विटाचे पिल्लर तयार करून त्यावर लाकडी पाट्यांचा प्लॅटफॉर्म तयार केला आहे. ह्या प्लॅटफार्म खाली ३ फूटाची पोकळी आहे. या पोकळीत उतरण्याकरिता अडीच बाय साडेतीन फूड लाकडाच्या पाट्याचे झाकण आहे. या तळघरावर त्याच आकाराची खोली आहे व तळघराच्या जाड भिंतीवर १४ फूट रुंदीचा व्हरांडा आहे. डी. एस. पी. बंगल्याच्या परिसरात सापांचा फार सुळसुळाट आहे. भूयाराचा मार्ग ५०० वर्षापूर्वीचा असल्यामुळे तो जीर्ण होऊन त्याला छिद्रे पडली असावीत त्यामुळे भूयार हे सापांचे आश्रयस्थान असावे. शेजारच्या घरी १५ ते २० फूट लांबीचा भूजंग येथील लोकांनी पाहिला आहे. परंतु येथील सापांनी कुणालाही दगा दिला नाही असे सांगतात. डी. एस. पी. बंगल्याजवळ शहेंशाह पहेलवान बाबाचा दर्गा आहे. त्या संबंधात एक दंतकथा आहे. बाबांची स्वारी पांढऱ्या घोड्यावर बसून या तळघरापर्यंत केव्हाही रात्री बेरात्री येत असे. येथील पहारेकरी सांगतात. बाबांमुळेच येथील साप दंश करीत नाही असे म्हणतात. या बंगल्याच्या परिसरात १९ व्या शतकातील इंग्रजांच्या तीन कबरी आहेत. ह्या तळघराचे खोदकाम केल्यास भूयार मार्गाचा निश्चितच शोध लागेल यात शंकात नाही. संकटकाळात किल्ल्याबाहेर जाण्याकरिता या मार्गाचा उपयोग करीत होते.

### (४) किल्ल्यातील प्रेवशद्वार –

किल्ल्यातील पश्चिम तटात एक प्रवेशद्वार आहे. ते माती गोट्याने बुजलेले आहे. तेथे कायमचे मोठे कुलूप असते. असे म्हणतात कि, किल्ल्यातील कैद्याने या मार्गाने पळून जाण्याचा प्रयत्न केला पण तो पुढे जाऊ शकला नाही. प्रवेशद्वार मोकळे केल्यास त्यातील रहस्य कळू शकेल.

(५) किल्ल्यात वायव्य कोपऱ्यात चांदशावली बाबाची कबर (ठाणे) आहे. मोहरमच्या दिवशी दशमीला गावातील सर्व सवाऱ्या येथे भेट देण्याकरिता येतात. म्हणून दशमीच्या दिवशी हा किल्ला (कारागृह) सायंकाळी जनतेसाठी खुला असतो.५ (६) हा सुरक्षित असलेला किल्ला आहे. इ. स. १८१७ मध्ये नागपूर येथे सीताबर्डीच्या लढाईचा संभव पाहून अप्पासाहेब भोसल्यांनी महाराणी बाकाबाई व भानारा किल्ल्यावर कितीतरी राजवटी आल्या व गेल्या. कितीतरी युद्धे झाली असतील पण किल्ला मात्र भानाऱ्याच्या गतकालीन वैभवशाली इतिहासाची साक्ष असून मोठ्या दिमाखाने उभा आहे. (सध्या ह्या किल्ल्यात जिल्हा कारागृह आहे.)

### भानाऱ्यावरील स्वाऱ्या –

(१) भानारा येथे राजपूत राजा राज्य करीत असताना रतनपूर (जि. बिलासपूर) येथील हैध्यवंशीय पराक्रमी राजा प्र. जाजल्लदेव याने १११४ च्या सुमारास भानारा लांजी, वैरागड येथे स्वारी करून सर्व परगने जिंकून घेतले. तेव्हा पासून भानारा येथील राजपूत राजा प्र. जाजल्लदेवाचा मांडलीक झाला. त्याने प्र. जाजल्लदेवाला इ. स. १११४ मध्ये खंडणी दिली असा उल्लेख रतनपूर येथील शिलालेखात आहे.

(२) देवगीरी येथील रामचंद्र देव ह्या यादव राजाने इ. स. १२७१ ते १३०९ या काळात भानारा येथील राजाला जिंकून ताब्यात घेतले व पूर्वी विदर्भातील झाडीपट्टी (भानारा जिल्हा) प्रदेश जिंकून घेतला असा उल्लेख पुरुषोत्तमपूरी (जि. बीड) येथे सापडलेल्या शिलालेखात आढळते.

(३) देवगढ येथील गोंड राज्याचा दिवाण रघुनाथसिंह भानाऱ्याला पळाल्यामुळे इतर जनानखाना भानाऱ्याला पाठविला होता. सोबत २ हजार फौज व सुभेदार निंबाळकर चंदाजी भोसले व नारायण नागरे हे सरदार होते.

## भानारा किल्ला वैभवाचे प्रतिक –

रघुजी भोसल्यांनी भानाऱ्यावर इ. स. १७३७ मध्ये स्वारी केली. या युद्धात रघुजीला विजय मिळाला. रघुजीच्या विजयी मोहिमेचा शुभारंभ भानारा युद्धापासून झाला.६

(४) माधवराव पेशव्याने नागपूर जिंकल्यावर मराठा सरदार रामचंद्र गणेश कानडे ह्या सरदारास भानाऱ्यावर पाठविले रामचंद्र कानडे यांने भानारा किल्ल्यावरस्वारी करून किल्ला जिंकून घेतला.७ शेवटी तहात हा किल्ला भोसल्यास परत मिळाला.

(५) दुसऱ्या रघुजी भोसल्यांच्या काळात पेंढाऱ्यांनी धाडी घालून लुटालूट सुरू केली होती. यातून भानारा सुटले नाही. भानाऱ्यावर इ. स. १८११ मध्ये आक्रमण करून पेंढाऱ्यांनी भानारा लुटून काढले.८ या भीतीमुळे लोक जमिनीत दाग–दागिने पुरून ठेवीत असत.

## अंबागड किल्ला (इ.स.१७००)

अंबागड हे गाव भंडारा जिल्ह्यातील तु सर तालुक्याच्या वायव्येस १४ि क.मी. अंतरावर ाहे. अंबागड हे डोंगराच्या पायथ्याशी बसलेले आदिवासी गाव आहे. अंबागड किल्ला सातपूडा पर्वत श्रेणीतील अंबागड ह्या तीन चारशे फूट उंच डोंगरावर आहे. येथे आंब्याच्या झाडांची विपूलता असल्यामुळे या गावाला व किल्ल्याला अंबागड म्हणतात.९ सध्या अंबागड ही नवीन वस्ती वसली असूनतिथून अंबागड डोंगर ३ कि.मी. अंतरावर आहे. हा प्रदेश जंगलाने व्यापल्यामुळेयेथे लोकांची फार वर्दळ नाही.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी –

देवगढ येथील गोंड राजांची या प्रदेशावर दीर्घकाळ सत्ता होती. या गोंड राजघराण्यात बख्तबुलंद हा पराक्रमी राजा इ. स. १७८७ मध्ये गादीवर विराजमान झाला त्याने अंबागडचे हत्त्व ओळखून त्याचा शिवनीचा (सुभेदार, सरदार) दिवाण वास्तुशास्त्रज्ञ राजाखान पठाण याला अंबागडला किल्ला बांधण्याचा आदेश दिला. राजाखान पठाणाने इ. स. १७०० मध्ये किल्ला बांधून पूर्ण केला.१० बख्तबुलंद नंतर त्याचा मुलगा चांदसुलतान इ. स. १७०९ मध्ये देवगढच्या गादीवर सत्तारुढ झाला. चांदसुलतान इ. स. १७३५ मध्ये मरण पावल्यानंतर त्याची पत्नी राणी रतन कुवरने इ. स. १७३९ मध्ये झालेल्या देवगढच्या तहात अंबागड किल्ला प्रथम रघुजी भोसल्यांना दिला. तेव्हापासून ८० वर्षे हा किल्ला भोसल्यांच्या ताब्यात होता.११किल्ला  हा डोंगरी किल्ला आहे. त्याचा आकार आयातकार असून त्याची लांबीसु ारे ७०० फूट पूर्व–पश्चिम आहे. त्याची रुंदी सु ारे १६०० फूट उत्तर–दक्षिण आहे. हा किल्ला खडकाळ डोंगरावर असल्यामुळे मजबूत आहे. किल्ल्याचा परकोट जिर्ण झाल्यामुळे मोडकळीस आला आहे. येथे लहान मोठे १० बुरुज आहेत. किल्ल्याच्या प्रवेश द्वाराजवळ दोन मोठे बुरुज आहेत. या बुरुजांची उंची ३० फूट आहे. बुरुजाचा वरचा गोलाकाराचा व्यास २६ फूट व पायथ्याजवळील व्यास ३२ फूट आहे. त्यापैकी उजवीकडील बुरुज आजही चांगला आहे. परंतु डावी कडील बरु जाचे प्लारॅ टर निघाल्यामुळे विटा दिसतात. विटा मातीने जोडल्यामुळे पावसाळ्यात हा बुरुज ढासळण्याचा संभव आहे. परकोटचा काही भाग ढासळलेला आहे. येथील किल्ल्याच्या भींती फक्त २ फूट रुंदीच्या आहेत.

## तोफा ठेवण्याचे ओटे –

येथील ५ बुरुजावर तोफा ठेवण्याकरिता ओटे केले असून ओट्याच्या मध्यभागी तोफ ठेवण्याकरिता खड्डा केलेला आहे. सध्या येथे एकही तोफ नाही. इंग्रजांनी इतरत्र हलविल्या असाव्यात. येथील प्रवेशद्वार चांगल्या अवस्थेत आहे. प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर समोर कमानी असलेल्या खोल्या दिसतात. या खोल्या पहारेकऱ्यांसाठी बांधलेल्या असाव्यात. कमानीवर नक्षिकाम केलेले दिसते.१२ प्रवेश द्वाराला लाकडाचा दरवाजा नाही. तो कुणीतरी नेला असावा. दोन बुरुजावर १० फूट उंचिचे दोन मिनार आहेत. द्विस्तरीय किल्ला हा किल्ला दोन स्तरीय (मजले) आहे. प्रवेश द्वारातून प्रवेश केल्यावर खालचा स्तर लागतो. येथे पाण्याचे अनेक टाके आहेत. या जवळ एक भयानकविहिरीचा खड्डा दिसतो. ती विषारी पाण्याची विहीर ावी.किल्ल्याच्या उत्तरेकडील परकोटाबाहेर डोंगराची कडा आहे व भयानक खोल खाई आहे. येथून गुन्हेगारांना कडेलोट करीत असावे. किल्ल्याच्या पश्चिम भागात एक मोठे टाके आहे. किल्ल्यातील वरचा (मजला) स्तर खालच्या स्तरापेक्षा २० फूट ते २५ फूट उंच आहे. या उंचवट्यावर दिवाणखाना व शाही इमारती इसाव्यात. तिथे आजही भींतीचे भग्नावशेष पहावयास मिळतात. या इमारती खाली तळघर आहे.

### किल्ल्याचे तळघर –

तळघरात अंधारातून पायऱ्याने उतरावे लागते. तळघरात अंधार असतो. (टॉर्च सोबत असावा) तळघराची लांबी ३० फूट, रुंदी १२ फूट व उंची २१ फूट आहे. तळघराच्या जमीनीचा भाग संगमरवर दगडाचा आहे. येथे ४ नक्षिदार कमानी आहेत. तळघरात हवा व प्रकाशासाठी तिरपे झरोखे ठेवलेले आहेत.१३ तळघरात शस्त्रे, खजाना वगैरे ठेवीत असावे. येथे अनेक मुर्ती दिसतात. गुन्हेगारास अंधार कोठडीत ठेवण्याकरिता या तळघराचा उपयोग होत असावा येथे एक दगडानेबुजविलेला दरवाजा आहे. कदाचित तो किल्ल्याबाहेर निघण्याचा गुप्त मार्ग असावा.१४

### भोसलेकालीन कारागृह

हा किल्ला दाट जंगलात एकाकी असल्यामुळे भोसल्यांच्या काळात गुन्हेगारांना या किल्ल्यात ठेवीत होते. या किल्ल्यातील विहीरीतील पाणी विषारी असल्यामुळे कैदी जास्त काळ जिवंतराहत नव्हते. याबाबतीत एक दंत कथा प्रचलित आहे.

### दंतकथा –

मोहाडी येथे एक कडू पटेल नावाचा कोष्टी राहत होता. तो जादूटोणा करण्यात प्रसिद्ध होता. म्हणून त्याला अटक करून अंबागड किल्ल्यात अंधार कोठडीत ठेवले. त्याने विहिरीतील विषारी पाणी पिल्यामुळे तो अंधार कोठडीतच मरण पावला. त्याला जुन्या अंबागड वस्तीजवळ डोंगराच्या पायथ्याशी पुरण्यात आले. त्या जागेवर दगड ठेवून लोक पूजा करू लागले. आपला रोग बरा व्हावा म्हणून लोक नवस करून कोंबडा बळी देऊ लागले. यालाच ‘अंबागड्या देव’ असे म्हणतात.१५

### प्रेक्षणीय किल्ला –

येथील किल्ल्यात परकोट, बुरुज, पहारेकऱ्यांच्या खोल्या, बुरुजावरील मिनार, तोफा ठेवण्याच्या जागा, कडेलोट करण्याचे ठिकाण, पाण्याचे टाके, इमारतीचे अवशेष, भूयारी रस्ते, तळघर वगैरे पाहण्यासारखे आहे. किल्ले कस असतात हे हा किल्ला पाहून कळते. विद्यार्थ्यांना दाखविण्यासारखा किल्ला आहे. शैक्षणिक सहलीकरिता हे स्थळ योग्य आहे. परंतु तेथे उंच झाडे, दाट गवत व झुडपे भरपूर प्रमाणात आहेत. त्यामुळे हिंस्त्र प्राण्यांना लपण्याकरिता भरपूर जागा आहे. डोंगराची चढण फार कठीण आहे. प्रवासांची साधने नाहीत. त्यामुळे लोकांची येथे वर्दळ नाही. डोंगराच्या पायथ्याशी हनु ान व गणपतीचे मंदीर आहे. पाण्याकरिता बोअरवेल आहे. पर्यटन स्थळ म्हणून विकास केल्यास येथे पर्यटकांचीव शाळेच्या सहलीची संख्या वाढण्यास कसलीच अडचण नाही.१६

### किल्ल्यावरील राजवटी

### गोंडाची सत्ता –

देवगड येथील गोंड राजा बख्तबुलंद याने इ. स. १७०० मध्ये अंबागड किल्ला बांधला तेव्हापासून चांदसुलतान शाह, राणी रतनकुवरने देवगढच्या तहात इ. स. १७३९ मध्ये हा किल्ला प्रथम रघुजी भोसल्यांना दिला. तेथपर्यंत एकूण ४० वर्ष गोंड राजाची सत्ता होती. भोसल्यांनी इ. स. १७३९ पासून इंग्रजांनी हा किल्ला जिंकेपर्यंत म्हणजे इ. स. १८१८ पर्यंत एकणू ८० वर्षे या प्रदेशावर भोसल्यांची सत्ता अस्तित्त्वात होती.

### सहानगड किल्ला (सानगडी) (इ.स.१७०४)

सानगडी हे गाव साकोलीच्या (जि. भंडारा) दक्षिनेस १० कि. मी. अंतरावर आहे. सानगडी ग्रामपंचायत कार्यालयाची स्थापना इ. स. १९५१ मध्ये झाली असून येथील लोकसंख्या ६ हजार ५८६ आहे. सुमारे ३०० वर्षापूर्वी या गावाचे प्रचलित नाव सहानगाव होते. हा प्रदेश त्या काळात प्रतापगड येथील गोंड राजाच्या ताब्यात होता. हा गोंड राजा चांघाच्या गोंड राज्याचा मांडलिक होता. चांघाचा गोंड राजा देवगड येथील गोंड राजा बख्तबुलंद शाह यांचा कट्टर शत्रू होता. म्हणून गोंड राजा बख्तबुलंदशाह डोंगराताल (जि. शिवनी) येथील सुभेदार राजाखानपठाण याला अंबागड वरून सहानगाव व प्रतापगडावर पाठविले.१७

### राजाखान पठाणची स्वारी (इ. स. १७०४) –

राजाखान पठाणाने इ. स. १७०४ मध्ये सहानगाव व प्रतापगढावर स्वारी करून दोन्ही परगणे जिंकून वैनगंगा परगण्यात सामील करून राज्यविस्तार केला.१८बख्तबुलंदशहाने त्याला सहानगाव येथे किल्ला बांधण्याचा आदशे दिला. राजाखानने बख्तबुलंदशहाच्या मदतीने सहानगाव येथे एक किल्ला बांधला त्यालाच 'गढी' असे म्हणतात.१९ कालांतराने सहानगावचे सहानगड झाले व नंतर सहानडी नाव प्रचलित झाले. बख्तबुलंदशहा नंतर त्याचा मुलगा चांदसुलतानने राज्यकारभार सांभाळून देवगड (जि. छिंदवाडा) येथील राजधानी नागपूरला आणून सहानगडचा कारभार पाहू लागला. नंतर रघुजी भोसल्यांनी चांदसुलतानचा अनौरस पूत्र वलीशहाशी लढाई करून पराभूत केले. राणी रतनकुवरने रघुजी भोसल्यास आपला तिसरा मुलगा मानून राज्याचा तिसरा हिस्सा संपूर्ण नागपूर व भंडारा हे दोन प्रांत बक्षिस म्हणून दिले. तेव्हापासून भंडारा प्रांताला वैनगंगा प्रांत म्हणून म्हटल्या जावू लागले. १४ फेबु्र ार, १७५५ मध्य` रघुजी भासे ल्याचं या मत्यनूतंरअप्पासाहेब भासे ले सहानगडचा शेवटचा राजा होता.

### किल्ला –

या किल्ल्याची पूर्व–पश्चिम लांबी सु ारे ४०० फूट व उत्तर–दक्षिण रुंदी सु ारे १६० फूट आहे. वरचा किल्ला उत्तर–दक्षिण ६० मीटर लांब व पूर्व–पश्चिम ४० मीटर रुंद आहे. या किल्ल्याला एकंदर ७ बुरुज असावेत. त्यापैकी ६ बुरुज व किल्ल्याच्या भींती उध्वस्त झाल्या आहेत. किल्ल्याचे भग्नावशेष पहावयास मिळतात. फक्त एक बुरुज व भींती काही ठिकाणी आपले अस्तित्व टिकवून आहे. किल्ल्याचे प्रवेश द्वार पश्चिमेकडे आहे. प्रवेशद्वार आजही चांगल्या अवस्थेत आहे. प्रवेशद्वाराची आतून लांबी १३ फूट व रुंदी १० फूट आहे. प्रवेशद्वाराचा लाकडी दरवाजा दिसत नाही. तो कुणीतरी नेला असावा. प्रवेश द्वाराच्या दोन्ही बाजूचे बुरुज ढासळलेले आहेत. बुरुजाचा ६ फूटापर्यंतचा भाग दगडाने बांधलेला आहे व त्यावरील भाग विटांनी बांधला आहे. किल्ला पूर्ण झाल्यावर राजाखान पठाण याला बख्तबुलंदशाहने इ.स. १७०४ मध्ये सहानगड येथे किल्लेदार नियुक्त केले व राजाखान पठाणाने केलेल्या पराक्रमाबद्दल शिवनी येथे दिवाण म्हणून नियुक्ती केली.२०

### परकोट व खंदक –

किल्ल्या भोवती परकोट व खंदक होता. परंतु काळाच्या ओघात परकोट ढासळल्यामुळे खंदक बुजले आहेत. येथे विहीर सुद्धा होत्या. पण त्या दगडाने, मातीने बुजलेल्या आहेत. किल्ल्यातील शाही इमारती उध्वस्त झाल्या असून त्याचे विटा मातीचे ढिगारे पहावयास मिळतात.

### मजार –

किल्ल्याच्या प्रवेशद्वाराच्या पश्चिमेकडे १०० फूटावर एक मोळकळीस आलेली मजार आहे. तिचा आकार चौकोनी आहे. तिला पुर्वेकडे दोन व उत्तरेकडे दोन दरवाजे आहेत. तिचे छत कोसळलेले आहे. तिथे काटेरी झाडे असल्यामुळे आतमध्ये जाता येत नाही. ही मजार राजाखान पठाणची असावी कारण त्याचा मुलगा महम्मदखाँ पठाण हा इ. स. १७४३ पर्यंत सहानगडावर किल्लेदार होता.

राजाखान पठाण शेवटच्या काळात आजारी असल्यामुळे मुलाजवळ राहात असावा. कारण तो. इ. स. १७४३ मध्ये सहानगडालाच मरण पावला म्हणून त्याची मजारत्याच्या मुलाने बांधली असावी. राजाखान पठाणचा मृत्यू झाल्यानंतर महम्मदखान पठाणला रघुजी भोसल्यांनी इ. स. १७४३ मध्ये शिवनीचा दिवाण केले. (हा किल्ला रघुजी भोसल्यांना इ. स. १७३९ मध्ये देवगडच्या तहात मिळाला होता.) इतिहासाची साक्ष देणारा बुरुज – सहानगड किल्ला उध्वस्त झाला. असला तरी येथील एक बुरुज गतकालीन वैभवाची स्मृती म्हणून आजही उभा आहे.२१ पण तो मोळकडीस आला आहे. बुरुजाला भेगा पडल्या आहेत. पूर्वी बुरुजावर तोफ होती. या बुरुजांची उंची ३० फूट व पायथ्याचा व्यास ४५ फूट आहे. तसेच वरचा व्यास ४० फूट आहे. बुरुजावर ११ फूट व्यासाचा व ३.६ फूट उंचीचा ओटा आहे. त्यावर तोफ ठेवली जात होती.

**सहानगड्ची तोफ –**

आता सध्या मात्र ही तोफ बुरुजांच्या पायथ्याशी विश्रांती घेत आहे. किल्ल्याच्या बुरुजाखाली गोंड कालीन एक ३.२७ मीटर लांबीची आणि ३५ से.मी. व्यासाची प्रचंड अशी तोफ आहे. तोफ मिश्र धातूची आहे. या तोफेचा मागचा भाग अंदाजे ४२ से.मी. व्यासाचा आहे. तोफेच्या समोरील भागात दोन डोळे व एक लांब पसरट नाक कारेलेले आहे. यावरून ही तोफ गोंड कालीन असावी. ही तोफ प्रत्येकी ८ से.मी. रुंद असलेल्या अंदाजे ६२ रिंगानी तयार केलेली आहे. या तोफेचा गोळा अंदाजे १५ सें.मी. व्यासाचा आहे. आजही गावकरी या तोफेची व गोळ्याची पूजा करतात.२२ या तोफेसंबंधी काही दंतकथा आहेत.

(अ) सहानगडावर इ. स. १८११ मध्ये पेंढाऱ्यांनी लूट करण्याकरिता आक्रमण केले. पेंढाऱ्यांना पळविण्याकरिता तोफजीने तोफ उठविली तेव्हा बारुदीचा स्फोट झाला. तो स्फोट एवढा भयंकर होता की पेंढारी लूट न करताच पळाले व तोफजीनी खंदकात उडी घेतली.

(ब) भोसल्यांच्या काळात १६ बैल जोड्या लावून तोफ हलविण्याचा प्रयत्न केला. पण तोफ हलली नाही.

(क) असे म्हणतात की, मुलीचे लग्न झाल्यावर तिला सासरी सुख मिळावे म्हणून तोफेला कोंबडा बळी देतात व स्त्रिया हिरव्या बांगड्या. आजही बांगड्याचे तुकडे पसरलेले दिसतात.२३

**सहानगडावरील राजवटी –**

या प्रदेशावर चांघाच्या गोंड राजांची दीर्घकाळ सत्ता होती. देवगडच्या गोंड राजांनी या प्रदेशावर १७०४ पासून १७३९ पर्यंत एकूण ३५ वर्षे राज्य केले. रघुजी भोसल्यांनी हा प्रदेश देवगडच्या तहात १७३९ मध्ये मिळाला. तेव्हापासून १८१८ पर्यंत एकूण ८० वर्षे भोसल्यांनी राज्य केले.

**स्वाऱ्या –**

बख्तबुलंदशहा या गोंड राजाचा दिवाण राजाखान पठाणाने या प्रदेशावर इ.स. १७०४ मध्ये स्वारी करून प्रदेश जिंकला व येथे इ. स. १७०४ मध्ये किल्ला बांधला.२४ पेंढाऱ्यांनी सहानगावची लूट करण्याकरिता आक्रमण केले पण तोफेच्या प्रचंड आवाजामुळे लूट न करताच पळाले.

**पवनीचा किल्ला –**

पवनी प्राचीन नगर पवनी हे भानाऱ्याच्या दक्षिणेस ४४ मैलावर वैनगंगेच्या दक्षिण किनाऱ्यावर वसलेले आहे. हे गाव सम्राट अशोक पासून अस्तित्वात आहे. येथे अनेक राजानी राज्य केले. येथील वैनगंगा नदीने या नगरीच्या सौंदर्यात भर टाकली आहे. गंगेवर वैजेश्वरी घाट, घोडेघाट, दिवाण घाट इत्यादी वेगवेगळ्या काळात बांधले आहेत. त्याचप्रमाणे पवनी हे मंदिराचे नगर आहे. येथील निळकंठेश्वर, वैजेश्वर, राममंदिर,मुरलीधर मंदिर व दत्त मंदिर प्रसिद्ध आहे. पवनी तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. पवनीचे पूर्वीचे नाव 'पद्ममपूर' होते. पुरातन काळात येथे पवन राजा राज्य करीत होता. त्याच्या नावावरून पवनी नाव पडले असे सांगतात. या पवन राज्या संबंधात एक अद्‌भूत दंत कथा आहे.२५

**दंतकथा –**

पवन राजा व राणी पद् ावती यांच्यात अद्‌भूत शक्ती होती. (अ) पवनराजा फार प्रसिद्धीस आला होता. त्याच्या नावावरून पवनी, वर्धा जिल्ह्यातील पोहणा व पवनार ही नावे पडली असावीत. पवन म्हणजे वारा. पवन राजाची हालचाल वायुप्रमाणे होती.२६ त्याचे साम्राज्य फार मोठे होते. तो पवनारा (जि. वर्धा) वरून १०० मैलाचा प्रवास करून सकाळी वैनगंगेवर आंघोळी करिता येत होता. त्यानंतर पोहणा गावी (जि. वर्धा) १३० मैलाचा प्रवास करून जेवायला जात होता. जेवण करून ३० मैल प्रवास करून पवनारला रात्री मुक्काम करीत असे.२७

(ब) त्याची राणी पद्‌मावती ही कमलपत्रावर उभी राहून तळ्यातील पाण्याच्या पृष्ठभागावरून चालत जाई व बारीक रेशमाच्या दोरीने कच्च्या मातीच्या भांड्याने पाणी काढीत असे.

(क) पवन राजाजवळ अगणित संपत्ती होती. लोखंडाचे सोने करण्याचा परिस होता. तो स्वःची कामे स्वतः करीत असे.

(ड) एकदा पोळ्याच्या दिवशी पवनी मधील स्त्रियांनी उंची वस्त्रे व दागदागिने घातले होते. त्यांना रस्त्यावरून जातांना पाहून आपणही दागिणे घालावे असे राणीला वाटले.२८ म्हणून राणीने सुद्धा दागिने घातले. पण झाले उलटेच. तीचे सामर्थ्य नष्ट झाले. राज्याच्या वैभवाचा ऱ्हास झाला. एक दिवस धरणीकंप होऊन पवनी गाव जमीन दोस्त झाले. त्याचब बरोबर पवन राजाचे समर्थ नष्ट झाले.२९

## पवनी येथील गोंड किल्ला –

पवनीवर मौर्य, शुंग, वाकाटक, चालूक्य राष्ट्रकूट यांनी दीर्घकाळ राज्य केले असावे. चालूक्यानंतर इ. स. ११८९ नंतर देवगीरीच्या यादव राजाचे काही काळ राज्य असावे. यादवानंतर देवगडच्या गवळी राज्यांचे राज्य असावे. कारण पवनी गावात गवळी राजांनी किल्ला बांधला होता. सध्या उध्वस्त झाला आहे. यानंतर चांघाच्या गोंड राज्यांनी या प्रदेशावर दीर्घकाळ राज्य केले. याच गोंड राजांनी पवनी येथे समुरे १५ व्या शतकात किल्ला बांधला असावा. याच काळात गोंड राजा करणशहाने उमरेडला किल्ला बांधला होता. पवनी गावाच्या तीन बाजूला शे–दिड्शे फूट उंचीची डोंगर माला आहे.त्याच डोंगरावर ३ मैल लांबीचा 'डोंगरी किल्ला' दगडाने बांधून काढला आहे. किल्ल्याला चार प्रवेशद्वार व ४ खिडक्या होत्या. किल्ल्याचा बराचसा भाग ढासळलेला आहे. त्याचे भग्नावशेष पहावयास मिळतात. गावाच्या नैऋत्येकडील टेकडीवर किल्ल्याचा काही भाग पहावयास मिळतो. किल्ल्यावर एक मिनार आहे. किल्ल्याच्या पश्चिमेकडील प्रवेशद्वार चांगल्या अवस्थेत आहे व तेच पवनी नगराचे मुख्य प्रवेशद्वार आहे.३० टेकडीच्या सभोवताल खंदक होता. टेकडीजवळ एक तलाव आहे. त्याला बालसमुद्र म्हणतात.३१ पवनीच्या उत्तरेकडे वैनगंगेचे विशाल पात्र आहे. गंगेचे पात्र ५०० ते ६०० यार्ड रुंद असावे. महाभारतात या नदीला वेणा नदी असे म्हणतात.

## अशोककालीन स्तूप –

सुमारे १९७१ च्या सुमारास पुरातत्व विभागाने पवनीजवळ उत्खनन केले.या उत्खननात सम्राट अशोक पूर्व काळातील नाने भांडे व बौद्ध स्तूप सापडला. या स्तूपाचे सभोवतालचे कटघर व प्रवेशद्वार हे शुंग राजाच्या काळातील आहेत. यावरून स्पष्ट होते की पवनी हे प्राचीन काळातील बौद्ध धर्माचे केंद्र होते. येथे एक शिलालेख सापडलेला असून त्यावरून वाकाटक राजा द्वितीय प्रवरसेन याच्या काळापर्यंत म्हणजे ५ व्या शतकापर्यंत पवनीचे महत्त्व कायम होते. येथील एका

शेतात रुपैम्मा या क्षत्रपाच्या स्मृती प्रीत्यर्थ उभारलेला एक दगडी खांब सापडलेला आहे.३२ गावात अनेक ठिकाणी प्राचीन काळातील स्मारकांचे उंचवटे दिसतात. या वरून असे वाटते की पवनी हे प्राचीन काळात एक विशाल, वैभवशाली व समृद्ध नगर असावे.

## पवनीवरील स्वाऱ्या –

१. पवनी हे अती प्राचीन नगर असल्यामुळे या प्रदेशावर अनेक राजवटी आल्या व गेल्या. येथे अनेक वेळा युद्ध झाले असावे. परंतु त्याचा इतिहास उपलब्ध नाही.

२. चांद्याच्या गोंड राजाची स्वारी –पवनी येथे गवळी राजाचा किल्ला होता. त्यावरून देवगढ येथील गवळी राजांचे येथे काही काळ राज्य असावे. गवळी राजांच्या पडत्या काळात चांघाच्या गोंड राजाने पवनीवर स्वारी करून १४ व्या किंवा १५ व्या शतकात जिंकले असावे.

३. रघुजी भोसल्यांची स्वारी (१७३९) –पवनी चांघाच्या गोंड राज्याच्या ताब्यात होती. त्या वेळी निळकंठशहा हा राजा राज्य करीत होता. रघुजीने इ. स. १७३९ मध्ये पवनीवर स्वारी केली. किल्ल्यात सैन्य जास्त नव्हते. तरीसुद्धा सैन्याची चकमक उडाली. त्यात रघुजीला विजय मिळाला. रघुजीने किल्ल्याचा बंदोबस्त करण्याकरिता तुळजोराम पंत ह्या विश्वासू सरदारास पवनीला ठेवून भानाऱ्याकडे कूच केले.३३

४. पेंढाऱ्याचे आक्रमण (इ. स. १८१८) –त्या काळात पवनी हे समृद्ध शहर होते. पवनीची प्रसिद्धी ऐकून पेंढारी लोकांनी पवनीवर तीनदा आक्रमण केले. पेंढाऱ्यांनी पवनीवर आक्रमण केल्यामुळे पवनीच्या लोकांनी दागदागीने व संपत्ती सोबत घेऊन वैनगंगेच्या पात्रात रेतीवर मुक्काम ठोकला. पण पेंढाऱ्यांनी त्याचा पाठलाग करून रेतीवर लोकांना लुटले. मात्र पेंढाऱ्याच्या तिसऱ्या आक्रमनाच्या वेळी लोकांनी एकजूट करून पेंढाऱ्यांना पिटाळून लावले.

## सारांश –

पंधराव्या शतकात भंडारा येथे गवळ्याने किल्ला बांधला, हा किल्ला सपाट जमिनीवर बांधलेला आहे. त्यामुळेच याला भुईकोट किल्ला म्हणतात. किल्ल्याच्या सभोवतालचे अवशेष नष्ट झालेले असून शासनाने या किल्ल्याचा उपयोग जिल्हा कारागृह म्हणून केला आहे. तु सरच्या उत्तरेस एका बसक्या टेकडीवर अंबागडकिल्ला बांधलेला आहे. राजाखान पठाण हा वास्तुशास्त्रज्ञ असल्याने १७०० मध्ये त्यांच्याकडून किल्ल्याचे बांधकाम करुन घेतले. पेंढाऱ्यांच्या उपद्रवापासून संरक्षण व्हावे या मुख्य उद्देशाने किल्ला बांधण्यात आला. या किल्ल्याचे वैशिष्ट्य म्हणजे तळघर, भुयारी मार्ग, राणीचे स्नानगृह व देवतांच्या मुर्ती होत. या किल्ल्याचा भोसले काळात तुरुंग म्हणून उपयोग करण्यात येत होता. याच राजाखान पठाणने सहानगड येथेही किल्ला बांधला. तेथील तोफ आज बुरुजाखाली असून लोक तिची मनोभावे पूजा करतात. पवनी नगरी वैनगंगेच्या उजव्यातिरावर वसली आहे. गवळी राजाने बांधलेला किल्ला उध्वस्त झाला आहे. चांद्याच्या गोंड राजाची सत्ता आल्यानंतर त्याने येथे पंधराव्या शतकात किल्ला बांधला. परकोट म्हणून मातीची भिंत टाकण्यात आली. बाहेरच्या भागाने खंदक होता. आजही त्याच्या खुणा दिसून येतात.


## संदर्भ सुचि


१. अंधारे, भा.रा. ''देवगडचे गोंड राजे'', पृ.५०
२. भोज एम. – ''भंडाऱ्याचे युद्ध'', पं.८
३. मोहतुरे, ''असा आमचा भंडारा जिल्हा'', पृ. १८
४. एम.भोज – ''भंडाऱ्याचे युद्ध'', पृ.९
५. ना.अ.भा.१ न ३१० पृ.४०४ अंधारे भा.रा. देवगडचे गोंड राजे, पृ. ५१
६. खरे,भाग २ न, ७८५, पृ. १३५१, काळे, या.मा., नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, पृ.११५,
७. काळे या.मा. : ना.भो.ई., पृ. २५१
८. अंधारे भा.रा. : देवगडचे गोंड राजे, पृ. ८८
९. Bhandara District Gazatteers, p. n
१०. चितळे श्रीपाद : विदर्भातील किल्ले, पृ. २७
११. Bhandara District Gazatteers, p. no. 180,अंधारे भा.रा. देवगडचे गोंड राजे,पृ.८९
१२. मो.सईद शेख, भंडारा
१३. सानगडी अहवाल, पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र शासन, नागपूर Bhandara District Gazatteers, p. no. 230 अंधारे भा.रा. देवगडचे गोंड राजे,पृ.९४
१४. Bhandara District Gazatteers, p. no. 230, अंधारे, पृ.९०
१५. चितळे श्रीपाद : विदर्भातील किल्ले, पृ. १९, नखाते दिनेश, पृ. ३१
१६. एम.भोज – ''भंडाऱ्याचे युद्ध'', पं.६३
१७. चितळे श्रीपाद : विदर्भातील किल्ले, पृ. २५, एम.भोज, पृ. ६३
१८. अंधारे भा.रा. देवगडचे गोंड राजे, पृ. ९१
१९. मोहतुरे, ह.रा., असा आमचा भंडारा जिल्हा, पृ. ३०
२०. Bhandara District Gazetteers, p. 28, डॉ.सुरेश मिश्र, पृ.१५१
२१. नखाते दिनेश, भंडारा जिल्हा गौरव, पृ. ३६
२२. Bhandara District Gazetteers, p. 219
२३. मोहतुरे ह.रा., असा आमचा भंडारा जिल्हा, पृ. २१
२४. Bhandara District Gazetteers, p. 220
२५. मेश्राम प्रदीप, विदर्भातील बौद्ध धर्म, पृ. ४
२६. शिवणकर दा.सि. : पावननगरी, पृ. १७ अंकूर स्मरणिका, १९९१
२७. चितळे, श्रीपाद,विदर्भातील किल्ले, पृ. ३४

२८. मेश्राम प्रदीप, विदर्भातील बौद्ध घर्म क्षेत्र पवनी, पृ. ७
२९. काळे, या.मा., नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, पृ. ४४